# University of Mumbai

परीक्षा विभाग
अधियांत्रिकी निकाल कक्ष,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पुर्व)
मुंबई – ४०० ०९८

क्र.परीक्षा/अधियांत्रिकी निकाल कक्ष/८७/२०१८

परिपत्रक:–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व वास्तुविशारद महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक, प्र. संचालक केंद्रीय संगणक सुविधा (CCF) यांना सुचित करण्यात येते की, व्दितीय सत्र (हिवाळी) २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या वास्तुविशारद पदवी परीक्षेचे प्रवेश अर्ज खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वरुन आता online खालील तारखांप्रमाणे घेण्यात येणार आहे.

1) Exam Code:1A00110 (Final Year B.Arch. (Sem. X) (CBSGS)) Commencement date: 22/10/2018

वरील अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वरुन Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:–

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित शुल्क | २५/०९/२०१८ ते ०३/१०/२०१८ | ०४/१०/२०१८ ( दुपारी २.३० वाजेपर्यंत ) |
| ०२ | विलंब शुल्क रु १००/– सहित | ०४/१०/२०१८ ते ०५/१०/२०१८ | ०६/१०/२०१८ ( दुपारी २.३० वाजेपर्यंत ) |
| ०३ | अति विलंब शुल्क रु ५००/– सहित | ०६/१०/२०१८ ते ०९/१०/२०१८ | १०/१०/२०१८ ( दुपारी २.३० वाजेपर्यंत ) |

वर नमुद केलेल्या तारखांचा तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमुद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वर Online भरुन ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करुन घ्यावेत व सदर inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाची Form submission Report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. **पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाहीत.**

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत) माध्यम परीक्षा केंद्र विषय व दिव्यांग इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करुन घ्यावी व इत्तर सर्व माहिती अचूक व बरोबर याची खात्री करुन घ्यावी. परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर यामध्ये कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

# University of Mumbai



परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (०९/१०/२०१८) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत **कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

**तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.**

exam form Link :- 1. muexam.mu.ac.in/examforms/
Exam form inward Link :- 2. muexam.mu.ac.in/inward/

(प्रा. (डॉ.) अर्जुन घाटुळे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक :--२५ सप्टेंबर, २०१८

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
४. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रिय संगणक सुविधा विभाग, मुंबई ९८.

ब. प्रत माहितीसाठी अग्रशित

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ
२. उपकुलसचिव, नावनोंदणी व पात्रता विभाग
३. मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
४. मा. प्र.कुलगुरु, कुलसचिव, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

(प्रा. (डॉ.) अर्जुन घाटुळे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक :--२५/ सप्टेंबर, २०१८

२५/९/१८ २५/९/१८